**ठळक बातम्या**

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची अंगोलाच्या अध्यक्षांबरोबर महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा / दोन सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या

- नवोन्मेष हा केवळ बुद्धिमत्ता आणि संशोधनाचा उत्सव नसून लोकांचं जगणं वेगळ्या पातळीवर नेण्याचा मार्ग असल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन

- राज्यातल्या २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरायला उद्यापासून सुरुवात होणार

**आणि**

- नंदुरबारमध्ये शाळेच्या विद्यार्थ्यांना घेऊन जाणारी बस दरीत कोसळून झालेल्या अपघातात दोन विद्यार्थी ठार, ५० पेक्षा जास्त जखमी

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज अंगोलाचे अध्यक्ष जोआओ लॉरेन्सो यांच्याशी भारत आणि अंगोला यांच्यातल्या द्विपक्षीय संबंधांच्या विविध पैलूंवर चर्चा केली. या चर्चेदरम्यान राष्ट्रपती मुर्मू यांनी दोन्ही देशांच्या सामाईक हिताच्या विविध क्षेत्रांमधलं सहकार्य वाढवण्यावर भर दिला. उत्तम संसदीय कार्यपद्धती, कृषी, विशेषतः बियाणं आणि खतं, तेलसाठ्यांचा शोध आणि शुद्धीकरण, दळणवळणाच्या पायाभूत सुविधा, दुर्मिळ खनिजं आणि हिऱ्यावर प्रक्रिया या क्षेत्रांकडे त्यांनी लक्ष वेधलं. या क्षेत्रांमध्ये अंगोलाबरोबर काम करायची भारताची तयारी असल्याचं राष्ट्रपतींनी सांगितलं. यावेळी दोन सामंजस्य करारांवरही स्वाक्षऱ्या झाल्या.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या मंगळवारपासून दोन दिवसांच्या भूतान दौऱ्यावर जाणार आहेत. या दौऱ्यादरम्यान, मोदी आणि भूतानचे राजे जिग्मे खेसर नामग्याल

वांगचुक, एक हजार वीस मेगावॅट क्षमतेच्या पुनात्सांगचु-२ या जलविद्युत प्रकल्पाचं उद्घाटन करतील. भारत आणि भूतान यांनी संयुक्तपणे हा प्रकल्प विकसित केला आहे. भूतानचे राजे जिग्मे सिंग्ये वांगचुक यांच्या ७०व्या जयंतीनिमित्त आयोजित समारंभात प्रधानमंत्री सहभागी होतील आणि भूतानचे प्रधानमंत्री त्शेरिंग तोबगे यांचीही भेट घेतील. यावेळी जागतिक शांती प्रार्थना महोत्सवात प्रधानमंत्री मोदी सहभागी होणार असून थिंपूमधील ताशिचोडझोंग इथे भगवान बुद्धांच्या पवित्र अवशेषांच्या स्थळी प्रार्थना करणार आहेत.

**<><><><><>**

उत्तराखंड राज्याचा आज २५वा स्थापना दिवस आहे. स्थापना दिनानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत देहरादून इथं विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात प्रधानमंत्री मोदी यांनी, विशेष टपाल तिकीटाचं प्रकाशन, उत्तराखंडमधल्या आठ हजार कोटी रुपयांच्या विकास कामांचं भूमीपूजन आणि उद्घघाटन केलं. तसंच प्रधानमंत्री पीकविमा योजनेतून २८ हजारांपेक्षा जास्त शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ६२ हजार कोटी रुपये हस्तांतरित केले. गेल्या २५ वर्षांत उत्तराखंडचं चित्र पूर्णपणे पालटलं असून विविध क्षेत्रातल्या उत्तराखंडच्या यशोगाथा इतरांना प्रेरित करतात असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी यावेळी केलं. उत्तराखंडनं पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य, ग्रामीण विकास यात भरीव कामगिरी केली आहे. राज्यात दोन लाख कोटी रुपये खर्चाच्या विकासकामांवर काम सुरू आहे, असं प्रधानमंत्री म्हणाले.

**<><><><><>**

नवोन्मेष हा केवळ बुद्धिमत्ता आणि संशोधनाचा उत्सव नसून लोकांचं जगणं वेगळ्या पातळीवर नेण्याचा मार्ग असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. मुंबईत एसएनडीटी विद्यापीठात, संस्थापक महर्षी कर्वे यांच्या स्मृतिदिनी आयोजित इनोव्हेशन महाकुंभाचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते.

नवनवीन कल्पना आणि नवीन संशोधनाला उद्योजकतेमधे रुपांतरित करण्यासाठी, राज्यसरकारनं विशेष स्टार्ट अप धोरण जाहीर केलं असून स्टार्टअप्सना प्रोत्साहन देण्याकरता विशेष निधी उभारला आहे असं ते म्हणाले. देशातले सर्वाधिक नोंदणीकृत स्टार्टअप्स महाराष्ट्रात असून त्यातले ४५ टक्के महिलांच्या नेतृत्वाखाली असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. राज्याचे कौशल्यविकास मंत्री मंगलप्रभात लोढा कार्यक्रमाला उपस्थित होते.

इनोव्हेशन महाकुंभाच्या निमित्तानं आयोजित नवोन्मेष स्पर्धेच्या विजेत्यांना, फडणवीस यांच्या हस्ते पारितोषिकं प्रदान करण्यात आली.

**<><><><><>**

राज्यातल्या २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरायला उद्यापासून सुरुवात होणार आहे. १७ नोव्हेंबरपर्यंत हे अर्ज भरता येतील. अर्जांची छाननी १८ नोव्हेंबर रोजी होणार आहे. अर्ज मागे घ्यायची शेवटी मुदत २१ नोव्हेंबर ही असून उमेदवारांची अंतिम यादी २६ नोव्हेंबर रोजी जाहीर केली जाणार आहे. या निवडणुकीत एकंदर १ कोटी ७ लाख ३ हजार ५७६ मतदार, ६ हजार ८५९ सदस्य आणि २८८ अध्यक्षांची निवड करतील. निवडणुकीसाठीचं मतदान २ डिसेंबर रोजी, तर मतमोजणी ३ डिसेंबर रोजी होणार आहे.

**<><><><><>**

नंदुरबारमध्ये अक्कलकुवा तालुक्यातल्या देवगुई घाटात, शाळेच्या विद्यार्थ्यांना घेऊन जाणारी बस दरीत कोसळून दोन विद्यार्थी ठार झाले, तर ५०पेक्षा जास्त विद्यार्थी जखमी झाले. दिवाळीच्या सुट्टीसाठी गावी गेलेले आदिवासी समुदायाचे विद्यार्थी या बसमधून आश्रमशाळेत परतत होते. मात्र चालकाचं नियंत्रण सुटल्यानं बस खोल दरीत कोसळली. स्थानिकांनी दरीत उतरून विद्यार्थ्यांना बाहेर काढलं. जखमी असलेल्या विद्यार्थ्यांवर उपचार सुरू असून

त्यापैकी २ ते ३ विद्यार्थ्यांची प्रकृती गंभीर असल्याचं, आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

**<><><><><>**

प्रसिद्ध लेखिका सुनीता देशपांडे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त त्यांच्या माहेरी म्हणजे रत्नागिरीत आयोजित करण्यात आलेल्या तीन दिवसांच्या विशेष उपक्रमाचा समारोप, आज सायंकाळी होत आहे. या कार्यक्रमात 'सुनीताबाई - पु.ल.' सेवाव्रती पुरस्कार, चिपळूणच्या 'सांजसोबत' या संस्थेला प्रदान करण्यात आला. सविस्तर वृत्तान्त आमच्या प्रतिनिधीकडून...

**व्हीसी (१. २८ सेकंद)**

*(लेखन, अभिनय, नृत्य आदी कला स्वतःकडे असूनही, सुनीताबाई आयुष्यभर वावरल्या त्या पु. ल. देशपांडे यांच्या गृहिणी-सखी-सचिव म्हणूनच. 'आहे मनोहर तरी' या पुस्तकातून सुनीताबाईंनी जी एक धिटाई दाखवली आणि दिली, त्यानंतर पुष्कळ लेखक आणि कलावंतांच्या पत्नींची अशी आत्मपर लेखनं प्रसिद्ध झाली. साधनशुचिता आणि कलेवरची अंतिम निष्ठा या दोन मूल्यांच्या साह्याने त्यांनी अतिशय निरलसपणे गृहिणीपण आणि सचिवपण पार पाडलं, असं निरीक्षण प्रसिद्ध लेखिका मंगला गोडबोले यांनी नोंदवलं. पु. ल. देशपांडे नावाचा एक बहुढंगी कलाकार त्यांनी महाराष्ट्राला मुक्तपणे मिळू दिला. त्यासाठी त्यांनी आयुष्यभर लागतील ते कष्ट घेण्याची आणि वाईटपणा घेण्याची सदैव तयारी ठेवली. निर्मिक हा कलाक्षेत्राचा आधार असून, त्यांच्या हक्कांची पायमल्ली करण्याचा अधिकार कोणालाही नाही, असं सांगत त्यांनी लेखक, कलावंतांच्या स्वामित्वहक्कांसाठी महत्त्वपूर्ण लढा दिला. किती तरी लेखकांची जन्मशताब्दी होते; मात्र लेखकपत्नीची जन्मशताब्दी होण्याचा योग दुर्मीळ आहे, असे उद्गार गोडबोले यांनी काढले. 'आहे मनोहर तरी'ची तात्त्विक समीक्षा करण्याचे प्रयत्न या जन्मशताब्दी वर्षात तरी अभ्यासक आणि विद्यार्थ्यांकडून व्हायला हवेत, अशी अपेक्षा लेखक प्रवीण बांदेकर यांनी व्यक्त केली. काव्यवाचन, अभिवाचन, त्याच्या स्पर्धा, पुस्तक प्रदर्शन, सामाजिक संस्थेला पुरस्कार असे विविध कार्यक्रम यात राबवण्यात आले. एकंदरीतच, हा उपक्रम सुनीताबाई आणि पुलंच्या पैलूंची चर्चा करणारा, स्मृती जागवणारा आणि त्या निमित्ताने साहित्य चळवळीला नवी प्रेरणा देणारा ठरला. आकाशवाणी बातम्यांसाठी अनिकेत कोनकर, रत्नागिरी)*

**<><><><><>**

मुंबई विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागात “पॉलिमर केमिस्ट्री रिसर्च लॅबोरेटरी” या संशोधन प्रयोगशाळेचं नूतनीकरण करण्यात आलं आहे. युरोफिन्स या कंपनीच्या उद्योग सामाजिक दायित्व निधीतून, या  प्रयोगशाळेत अत्याधुनिक सुविधा कार्यान्वित करण्यात आली आहे. या प्रयोगशाळेमुळे पॉलिमर, बॅटरी सामुग्री आणि अनुप्रयुक्त विज्ञान क्षेत्रातल्या संशोधनाला नवचैतन्य मिळणार आहे.

**<><><><><>**

नागपूरच्या राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालयानं तेल आणि वायू क्षेत्रातील अग्निसुरक्षा आणि आपत्ती व्यवस्थापन या विषयावर उद्यापासून दोन दिवस राष्ट्रीय कार्यशाळा आयोजित केली आहे.  पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या तेल उद्योग सुरक्षा संचालनालय यांच्या सहकार्यानं ही कार्यशाळा होणार आहे. यात देशभरातल्या राष्ट्रीय तेल कंपन्या, नियामक संस्था, राज्य अग्निशमन सेवा आणि

आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणा यांचे १०० हून अधिक प्रतिनिधी आणि २० विषय तज्ञ सहभागी होणार आहेत.

**<><><><><>**

शिक्षक पात्रता परीक्षा-टीईटी संदर्भात सर्वोच्च न्यायालयाच्या  निर्णयावर. सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल करावी, या आणि इतर मागण्यांसाठी, राज्य प्राथमिक शिक्षक मध्यवर्ती संघटनेच्या सोलापूर जिल्हा शाखेनं आज जिल्हाधिकारी कार्यालयावर मूक मोर्चा काढला. जिल्हा परिषद, आणि खासगी शाळांमधल्या २५ पेक्षा जास्त संघटनांचे हजारो शिक्षक, मोर्चात सामील झाल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे. जुनी निवृत्तीवेतन योजना लागू करावी, शिक्षणसेवक पद रद्द करावं, शिक्षकांची ऑनलाईन कामं बंद करावी या मागण्याही संघटनेनं केल्या आहेत.

**<><><><><>**

नाशिक महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे माजी सभापती संजय साबळे यांच्यासह वंचित बहुजन आघाडीच्या अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी, आज आनंदराज आंबेडकर यांच्या उपस्थितीत रिपब्लिकन सेनेमध्ये प्रवेश केला. दोन दिवसांपूर्वीही आघाडीच्या अनेक पदाधिकाऱ्यांनी राजीनामे दिले होते.

**<><><><><>**

राज्याच्या काही भागात थंडीची चाहूल लागली आहे. मुंबईत गेले दोन दिवस रात्रीच्या तापमानात घट दिसून आली. येत्या दोन दिवसांत संपूर्ण राज्यात हवामान कोरडं राहील असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**